**<u>उलटतपास वादींतर्फे वकील श्री. ए. पी. पोवार यांच्यामार्फत शपथेवर सुरु,</u>**

११. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीराम, दौलत, आण्णा व नाना अशी चार मुले आकाराम यांना होती. हे म्हणणे खरे आहे की, या चौघांमधील धोंडीराम हा सर्वांत मोठा मुलगा होता. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीराम यांचे नंतर दौलत त्यानंतर आण्णा व त्यानंतर नाना अशी अपत्य होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या एकूण जमीनी १४ आहेत त्यात त्यांचे गट क्र. ३४२, ३४६, ३६०, ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४३७, ४३८, ४४७, ४५३, ५१६ आणि ५१८ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी वर वर्णन उल्लेख केलेल्या सर्व जमिनींचे उतारे पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वर वर्णन केलेल्या सर्व जमिनींच्या सातबाऱ्यांना सर्व हिस्सेदारांची नावे नमूद आहेत. मी फेरफार क्र. २१२५ आणि १९६९ हे पाहिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी सन १९७७–७८ पासूनचे उतारे पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या उताऱ्यांवर धोंडीराम आकाराम करंबळे यांची एकत्र कुटुंबप्रमुख अशी नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीराम यांनी मिळविलेल्या उत्पन्नाबाबतचे कागदपत्र या कामी मी हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनींमधून किती उत्पन्न मिळाले, किती खर्च झाले, किती शिल्लक राहिले याबाबतचा कागदोपत्री तपशील मी या कामी हजर केलेला नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, आकाराम यांच्या मृत्यू नंतर घरातील कर्ता पुरुष या नात्याने धोंडीराम हे सर्व व्यवस्था पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी आमचे उत्पन्नाचे एकमेव साधन शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीराम यांचे सोबत त्यांचे

भाऊ देखील शेती कसत होते. हे म्हणणे खरे नाही की, पुढारी या नात्याने धोंडीराम हा सर्व व्यवहार पाहत होता.

१३. हे म्हणणे खरे आहे की, आमचेमध्ये व वादींमध्ये दावा मिळकतींचे लेखी विभाजन झाल्याबाबतचे कागदपत्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे भाऊबंद असल्यामुळे तसेच आमचे चांगले संबंध असल्यामुळे आमचे व्यवहार हे एकत्रात पाहिले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, कोर्टामध्ये लिलावाद्वारे गट क्र. ४३७ हा धोंडीराम यांचे नावे खरेदी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की,धोंडीराम व सखाराम विठू खोंद्रे यांचेदरम्याने दावा चालला होता. हे म्हणणे खरे आहे की, खोंद्रे यांनी त्रास द्यायला सुरुवात केल्यामुळे तो दावा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३४६ ही जमीन आम्ही वादी व प्रतिवादी मिळून करतो. हे म्हणणे खरे आहे की, गंगुबाई पाठक यांचेकडून स्वतःच्या उत्पन्नातून जमीन घेतल्याबाबतचा धोंडीराम यांचा कागदोपत्री पुरावा मी या कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. ४ ते ९ मधील मजकूर मी खोटा सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३४२, ३४६ व ४३७ या मिळकती एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून विकत घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

सही/-

दि. २१/०७/२०२५.

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा